निमंत्रण तथा विनंती अर्ज

प्रति,

Honorable

Principal Govt Engg College

विषय – रविवार दि. ३ जुलै २०२२ ला जागतिक प्लास्टीक बॅग निर्मुलन दिनानिमीताने इको ब्रिक्स संकलन तथा जनजागृती कार्यशाळा उपक्रमास सहकार्य मिळणेबाबत...

आदरणीय सर/मॅडम

यवतमाळ प्लॉगर आणि प्रयास यवतमाळ या पर्यावरण विषयात सेवारत असलेल्या संस्था आपणास परिचित असेलच. दोनही संस्था प्लास्टीक निर्मुलन या विषयातही कार्यरत असुन ३ जुलैला नगर परिषदेच्या सहकार्याने जागतिक प्लास्टीक बॅग निर्मुलन दिनानिमीत इको ब्रिक्स संकलन तथा जनजागृती कार्यशाळा उपक्रम राबवीण्याचे ठरले आहे.

उपरोक्त पर्यावरणपुरक उपक्रमाकरिता आपल्या सहकार्याची गरज आहे. या उपक्रमाचा संदेश आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्यास त्यांचे माध्यमातुन हा प्लास्टीकमुक्तीचा संदेश जास्तीत जास्तीत घरादारापर्यंत पोहोचविणे शक्य होणार आहे. करीता आपल्या संस्थेत विद्यार्थ्यांशी पी.पी.टी. द्वारे संवाद साधण्याकरिता कृपया वेळ मिळावा ही विनंती.

(कृपया अपेक्षित सहकार्य)

आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी आपल्या घरुन अथवा आपल्या शाळा/कॅालेज परिसरातुन संकलित केलेला प्लास्टीकचा कचरा प्लास्टीकच्या बॉटल्समध्ये भरुन इको ब्रिक्स तयार करावयाच्या आहे. या इको ब्रिक्समध्ये प्लास्टीकचे तुकडे, पन्नी आदी प्लास्टीकचाच कचरा भरावयाचा आहे. प्लास्टीक भरलेल्या बॉटल्सलाच इको ब्रिक्स असे संबोधतात. या इको ब्रिक्स आपल्या संस्थेच्या माध्यमातुन अथवा विद्यार्थ्यांनी वैयक्तिकपणे नगर परिषद इमारतीच्या वाहनतळ येथे २ जुलैला कार्यालयीन वेळांमध्ये जमा करावयाच्या आहेत. जास्तीत जास्त इको ब्रिक्स जमा केलेल्यांना ३ जुलैला सकाळी नगर परिषदेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते समारंभपुर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सहभागींना प्रमाणपत्रही वितरित करण्यात येणार आहे.

रविवार दि. ३ जुलैला सकाळी ७ ते ९ दरम्यान नगर परिषद कार्यालय परिसरात होणार असलेल्या प्लास्टीक संकलन मोहीमेतही शक्य त्या विद्यार्थ्यांना उपस्थित राहता येईल. तसेच नगर परिषदेच्या वाहनतळात ३ जुलैला सकाळी ७:३० वाजता होणार असलेल्या ईको ब्रिक्स निर्मिती कार्यशाळेतही विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. येथे इको ब्रिक्स निर्मीतीचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

कृपया आपले अमुल्य सहकार्य देत आम्हास उपकृत करावे ही विनंती. धन्यवाद...

यवतमाळ

दि. 28/06/2022

आपलेच अर्जदार

Gymkhana for n.a.

तर्फे

प्रयास यवतमाळ

संपर्क

9850316211 / 7083137804 / 9689042909

तर्फे

यवतमाळ प्लॉगर

Scanned with CamScanner

सस्नेह नमस्कार

जाहिर आवाहन

प्रयास

यवतमाळ

YAVATMAL PLOGGERS

## जागतिक प्लास्टीक बॅग निर्मुलन दिनानिमित्त

# ईको ब्रीक्स संकलन व जनजागृती कार्यशाळा

No Plastic

No Plastic

**रविवार दिनांक 3 जुलै 2022 ला सकाळी 7 वाजता**

*** स्थळ ***

**नगर परिषद कार्यालय, यवतमाळ**

आपल्या घरातील अथवा परिसरातील सर्व प्रकारचे प्लास्टीक हे प्लास्टीक बॉटलमध्ये भरुन या ईको ब्रिक्स नगर परिषद कार्यालयाच्या वाहनतळात २ जुलै २०२२ ला कार्यालयीन वेळेत जमा करुन त्याची नोंद करावी. जास्तीत जास्त ईको ब्रिक्स तयार करणाऱ्यांना नगर परिषदेतर्फे ३ जुलैला सकाळी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात येणार आहे.

३ जुलै २०२२ ला सकाळी ७ वाजता नगर परिषद कार्यालयाच्या परिसरात प्लास्टीक निर्मुलन अभियान होणार आहे. प्लास्टीकमुक्त यवतमाळकरिता आपलाही हातभार लागण्यासाठी कृपया यवतमाळकरांनी स्वयंस्फुर्तपणे उपस्थित राहावे ही विनंती.

शालेय तथा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ३ जुलै २०२२ ला सकाळी ७:३० वाजता नगर परिषद कार्यालय येथे होणार असलेल्या ईको ब्रिक्स प्रशिक्षण व निर्मीती कार्यशाळेत कृपया उपस्थित राहुन या ईको ब्रिक्स निर्मीतीचा सेवाभावी आनंद घ्यावा.

संपर्क : 9850316211 / 7083137804 / 9689042909

*Get together for Clean Cotton City*

Scanned with CamScanner